चौकशी अधिकरी यांची नेमणूक करणेबाबत.
श्री. संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत-पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर येथील गैरवर्तनाबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ 292 /२०२४
अहमदनगर, दिनांक - 03 / 05 /२०२४

संदर्भ :- १.कार्यायलीन आदेश साप्रवि-२/ग्रापं-३/७१४/२०२२, दिनांक- ०१/११/२०२२ (सेवानिलंबन आदेश)
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र /ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१३४/२०२४, दिनांक- ०६/०३/२०२३
३. श्री.संजय महादु मते ग्रामसेवक यांचा खुलासा २१/०३/२०२४
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

ज्या आर्थी, श्री. संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत- पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर येथे कार्यरत असताना गट विकास अधिकारी यांना शिवीगाळ,दमदाटी करणे,अतिक्रमण नोंदवही न ठेवणे, घरपटटी पाणी पटटी वसुलीचे प्रमाण कमी असणे व अन्य प्रकारचे ग्रामपंचायत कामकाजात गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.०२ अन्वये, दोषारोप ठेवणेत आले होते. सदरचे दोषारोप दिनांक १२/०३/२०२४ रोजी श्री. संजय महादु मते ग्रामसेवक ग्रामसेवक, यांना समक्ष बजावले असून त्यांनी संदर्भ क्रमांक ०३ अन्वये खुलासा सादर केलेला आहे.त्यांचे गैरवर्तनाचे १ ते ०८ दोषारोप तयार करण्यात आलेले आहेत. श्री.मते यांनी सर्व १ ते ८ आरोप खुलाश्यामधे नाकबुल केलले आहेत. सबब, त्यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते.

त्या आर्थी, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करुन श्री. संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत ,पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे.

Scanned with OKEN Scanner

या विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील. चौकशी अधिकारी यांना संदर्भ क्र.४ मधील सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in उपलब्ध करण्यात आला या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202405030600069 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

सहा. आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत श्री.संजय महादु मते ग्रामसेवक, ग्रामपंचायत- पुणेवाडी/ हत्तलखिंडी पंचायत समिती पारनेर यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचीका पृष्ठ क्र. १ ते या समवेत जोडले आहे. चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- श्री.संजय महादु मते से.नि.ग्रामसेवक पारनेर
व्दारा :-गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांना
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

२/- सोबतचा आदेश संबधित ग्रामसेवक, यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- श्री.जगताप संजय सर्जेराव, सादरकर्ता विस्तार अधिकारी,(पंचायत)पंचायत समिती पारनेर
प्रत :- निवड नस्ती.

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner